

# श्री ज्ञानेश्वरी
# अध्याय आठवा

या अध्यायाला अक्षरब्रह्मयोग असे नांव दिले आहे.मागील अध्यायाचे शेवटी भगवंतानी अधीयज्ञ,अधीदैव,अध्यात्म वगैर संज्ञांचा उल्लेख केला आहे. त्यांचे स्पष्टिकरण अर्जुन या अध्यायाचे सुरवातीला विचारतो. ब्रह्माचे अक्षरत्व, कर्म म्हणजे काय आणि जीव, आत्मा, परमात्मा यांचे विवेचन या अध्यायात आले आहे म्हणून याला असे नांव दिले आहे. यातील बरेचसे विवेचन पुढे विस्ताररुपाने तेराव्या अध्यायात आले आहे. तेराव्या अध्यायातील क्षराक्षरविवेचनाचा येथे पाया घातला आहे.

यात 28 श्लोक असून त्यावर 271 ओव्या आहेत. यातील 72,73,74 या ओव्या दृष्टांताच्या परीने सुंदर आहेत.सहावा श्लोक पण सुंदर आहे.

**श्रीज्ञानेश्वरी**
**अध्याय आठवा**

**अर्जुन उवाच**
**किं तद् ब्रह्म  किमध्यात्मं किं  कर्म पुरुषोत्तम ।**
**अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ।।1।।**
**अर्जुन म्हणालाः हे पुरुषोत्तमा! ते ब्रह्म म्हणजे काय? अध्यात्म म्हणजे काय? कर्म म्हणजे काय? अधिभूत कशाला म्हणावयाचे? आणि अधिदैव कशाला म्हणतात?.**

मग , अर्जुने म्हणितले । हां , हो जी , अवधारिले ? ।
जे म्यां पुसिले । ते निरुपिजो ।।1।।
सांगा, कवण ते ब्रह्म ?।कायसया नाम कर्म ? ।
अथवा अध्यात्म । काय म्हणिपे ?।।2।।
अधिभूत [1] ते कैसे ?। एथ अधिदैव [2] ते कवण असे  ?।     1 पंचभूताश्रयी विनाशी वस्तु
हें , उघड , मी परियेसे । ऐसे बोला ।। 3।।     2 जीव

**अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ।**
**प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्माभिः ।। 2।।**
**अधियज्ञ कसा असतो? आणि या देहात हे मधुसूदना ! कोण अधिदेह आहे ? आणि इंद्रियनिग्रह करणारे अंतकाली तुम्हास कसे ओळखतात हे मला सांगा.**

देवा  अधियज्ञ [3] तो काई ? । कवण पां इये देही ? ।     3 शरीरात शरीर भावाचे उप-
हे अनुमानासि [4] काही । दिठी न भरे ।। 4।।     शमन करणारा 4 विचार करता
आणि नियता [5] अंतःकरणी । तू जाणिजसी देहप्रयाणी ।     5 संयमयुक्त
ते कैसेनि ? हे शाङर्गपाणी । परिसवा माते ’ ।। 5।।
देखा !  धवळारी [6]  चित्तामणीचा,। जरी पहुडला होय,दैवाचा [7] ।     6 चुनेगच्ची घर 7 भाग्यवान
तरी वोसणताही [8] बोलु तयाचा । सोपु[9] न वचे ।। 6।।     8 बरळणे 9 व्यर्थ
तैसे , अर्जुनाचिया बोलासवे । आले तेचि म्हणितले देवे ।
ते  ’ परियेसे , गा बरवे। जे पुसिले तुवा ’ ।। 7।।
किरीटी कामधेनुचा पाडा । वरी कल्पतरुचा आहे मांदोडा [10] ।     10 मंडप
म्हणौनि मनोरथसिद्धीचिया चाडा [11]। तो नवल नोहे ।। 8।।     11 इच्छा
श्रीकृष्ण कोपोनि ज्यासी मारी । तो पावे परब्रह्मसाक्षात्कारी ।
मा , कृपेने उपदेशु करी । तो कैशापरी न पवेल ? ।। 9।।
जै कृष्णचि होइजे आपण, । तै कृष्ण होय आपुले अंतःकरण ।
मग संकल्पाचे आंगण । वोळगती सिध्दी ।। 10।।

परि ऐसे जे प्रेम । ते अर्जुनीचि आथि निस्सीम ।
म्हणौनि तयाचे काम ।सदा सफळ ।।11।।
या कारणे, श्रीअनंते, ।ते मनोगत तयाचे पुसते ।
होईल; जाणौनि, आइते । वोगरुनि [1] ठेविले ।। 12।। 1 वाढून
जे अपत्य थानीहून निगे । तयाची भूक ते मायेसीचि लागे ।
एऱ्हवी ते , शब्दे काय सांगे ?। मग स्तन्य दे , येरी ? ।।13।।
म्हणौनि कृपाळुवा गुरुचिया ठायी । हे नवल नोहे काही ।
परि ते असो ; आइका काई । जे देव बोलते जाहले ।। 14 ।।

**श्रीभगवानुवाच**

**अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।**
**भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ।।3 ।।**

**श्रीभगवान म्हणालेः सर्वाहून परम असे जे अक्षर म्हणजे कधीहि नाश न पावणारे तत्त्व ते ब्रह्म व प्रत्येक वस्तुचा स्वतःचा जो मूळ भाव त्यास अध्यात्म असे म्हणतात. अक्षर ब्रह्मापासून भूतमात्रादि चराचर पदार्थांची उत्पत्ति करणारा जो विसर्ग म्हणजे सृष्टि व्यापार त्याचे नांव कर्म.**

मग म्हणितले सर्वेश्वरे । ' जे आकारी इये खोकरे [2] । 2 फुटके
कोंदले असत ; न खिरे [3] । कवणे काळी ।। 15 ।। 3 गळते
एऱ्हवी,सपूरपण [4] तयाचे पहावे,। तरी शून्यचि नव्हे स्वभावे ! । 4 सूक्ष्मता
वरि गगनाचेनि पालवे [5] । गाळूनि घेतले ।। 16 ।। 5 पदर
जे , ऐसेही , परि विरुळे [6]। इये विज्ञानाचिये खोळे । 6 झिरझिरीत
हालवलेहि ; न गळे । ते परब्रह्म ।। 17।।
आणि आकाराचेनि जालेपणे । जन्मधर्माते नेणे ।
आकारलोपी निमणे । नाही कही ।। 18 ।।
ऐशिया आपुलियाची सहज स्थिती । जया ब्रह्माची नित्यता असती ।
तया नाम सुभद्रापती । अध्यात्म गा ।। 19।।
मग गगनी जेवि निर्मळे ।, नेणो, कैची एके वेळे ।
उठती घनपटळे । नानावर्णे ।। 20 ।।
तैसें , अमूर्ती तिये विशुध्दे । महदादि भूतभेदे ।
ब्रह्मांडाचे बांधे [7]। होचि लागती ।। 21 ।। 7 आकार
पै,निर्विकल्पाचिये बरडी [8]। फुटे आदिसंकल्पाची विरुढी [9] । 8 माळ जमीन 9 वाढ
आणि ते सवेचि मोडोनि ये ढोंढी [10]। ब्रह्मगोळकांच्या ।।+22। 10 आकार
तया एकैकाचे भीतरी पाहिजे,। तंव बीजाचाची भरिला देखिजे ।
माजी होतिया जातिया , नेणिजे । लेख[11] जीवा ।।+23।। 11 गणती

मग तया ब्रह्मगोळकांचे अशांश । प्रसवती आदिसंकल्प असमसहास [1] ।   1 असंख्य
हे असो ; ऐसी बहुवस । सृष्टी वाढे ।।+24।।
परि  दुजेनणि एकला । परब्रह्मीचि , संचला ।
अनेकत्वाचा आला । पूर जैसा ।।25।।
तैसे समविषमत्व नेणों , कैचे । वायांचि चराचर रचे ।
पाहतां , प्रसवतिया योनीचे। लक्ष दिसती ! ।। 26।।
येरी जीवभावाचिये पालविये । काही मर्यादा करु नये ।
पाहिजे कवण हे आघवे विये ?। तंव मूळ ते शून्य ! ।।27।।
म्हणौनि कर्ता मुद्दल न दिसे । आणि सेखी [2]  कारणही काही नसे।   2 शेवटी
माजी कार्यचि आपैसे । वाढो लागे ।। 28।।
ऐसा करितेनविण गोचरु [3] ।अव्यक्ती हा आकारु ।   3 दिसतो
निपजे जो व्यापारु , ।तया नाम कर्म ।।29।।

**अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।**
**अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभूतां वर ।। 4।।**

**उत्पन्न झालेल्या सर्व भूतांची क्षर म्हणजे नामरुपात्मक किंवा नाशवंत अशी जी स्थिती ते अधिभूत आणि या पदार्थात जो पुरुष म्हणजे सचेतन अधिष्टाता तो अधिदैवत; ज्याला अधियज्ञ म्हणजे सर्व यज्ञांचा अधिपति म्हणतात तो मीच , हे देहधाऱ्यात श्रेष्टा ! या देहाच्या ठायी अधिदेह आहे.**

आतां , अधिभूत जे,म्हणिपे । तेहि सांगो संक्षेपे ।
तरी , होय आणि हारपे । अभ्र जैसे ।।30।।
तैसें , असतेपण आहाच ।' नाही  होइजे '  हे साच ।
जयाते रुपा आणिती पांचपांच ।मिळोनिया ।।31।।
भूतांते अधिकरुनि [4]  असे । आणि भूतसंयोगे तरी दिसे ।   4 आश्रयकरून
जे वियोगावेळे भ्रंशे । नामरुपादिक ।। 32।।
तयाते ' अधिभूत '  म्हणिजे । मग  ' अधिदैव '  पुरुष जाणिजे ।
जेणे प्रकृतीचे भोगिजे । उपार्जिले [5] ।। 33।।   5 मिळवलेले
जो चेतनेचा चक्षु । जो इंद्रियदेशीचा अध्यक्षु ।
जो देहास्तमानी वृक्षु । संकल्प विहंगमाचा [6] ।। 34 ।।   6 पक्षी
जो परमात्माचि परी दुसरा । जो अहंकार निद्रा निदसुरा [7] ।   7 निजलेला
म्हणौनि , स्वप्नीचिया वोरबारा [8] । संतोषे ! शीणे ! ।।35।।   8 खटपट
जीव येणे नांवे । जयाते आळविजे स्वभावे ।
ते  ' अधिदैवत '  जाणावे । पंचायतनीचे [9] ।। 36।।   9 शरीर
आतां , इयेचि शरीरग्रामी । जो शरीरभावाते उपशमी [10] ।   10 नाहीसा करणे
तो  ' अधियज्ञु '  एथ गा ! '  मी ' । पंडुकुमरा ! ।। 37 ।।

येर अधिदैवाधिभूत [1], । तेहि मीचि , कीर , समस्त ।
परि , पंधरे किडाळा [2] मिळत ?। ते काय सांके [3] नोहे ? ।। 38।।
तरि , ते पंधरेपण न मैळे । आणि किडाळाचियाही[4] अंशा न मिळे ।
परि , जव असे तयाचेनि मेळे , । तव सांकेचि म्हणिजे ।। 39 ।।
तैसें , अधिभूतादि आघवे । हे अविद्येचेनि पालवे [5] ।
झाकले , तव मानावे । वेगळे ऐसे ।। 40 ।।
तेचि अविद्येची जवनिका [6] फिटे,। आणि भेदभावाची अवधी [7] तुटे ,।
मग,म्हणो ' एक होऊनि जरी आटे ' । तरी काय दोनी होती ?।। 41 ।।
पै , केशाचा गुंडाळा । वरि , ठेविली स्फटिकशिळा ।
ते वरि पाहिजे डोळा , । तव भेदली गमती ।। 42 ।।
पाठी , केश परौते नेले ,। आणि भेदलेपण,काय , नेणो जाहाले ? ।
तरी , डांक देऊनि सांदिले [8] । शिळेते काई ? ।। 43 ।।
ना , ते अखंडचि आयती । परि , संगे भिन्न गमली होती ।
ते सारिलिया , मागौती । जैसी कां तैसी ।। 44 ।।
तेवीचि , अहंभावो जाये , । तरी ऐक्य ते आधीचि आहे ।
हेचि , साचे जेथ होये , । तो अधियज्ञु मी ।। 45 ।।
पै गा ! आम्ही तुज । सकळ यज्ञ कर्मज ।
सांगितले , कां जे काज । मनी धरूनि ।। 46 ।।
तो , हा सकळ जीवांचा विसावा । नैष्कर्म्य सुखाचा ठेवा ।
परि उघड करुनि , पांडवा ।दाविजत असे ।।47।।
पहिलिया [9] वैराग्यइंधन परिपूर्ती [10] । इंद्रियानळी [11] प्रदीप्ती [12] ।
विषयद्रव्याचिया आहुती । देऊनिया ।। 48 ।।
मग वज्रासन तेचि उर्वी [13] । शोधूनि ,आधारमुद्रा [14] बरवी [15] ।
वेदिका [16] रचे मांडवी [17]। शरीराच्या ।। 49।।
तेथ संयमाग्नीची कुंडे ।इंद्रियद्रव्याचेनि पवाडे ।
यजिजती उदंडे । युक्तिघोषे ।। 50 ।।
मग मनप्राण संयमु , । हाचि हवनसंपदेचा संभ्रमु [18] ।
येणे संतोषविजे , निर्धूमु । ज्ञानानळु ।।51।।
ऐसेनि हे सकळ ज्ञानी समर्पे , । मग ज्ञान , ते ज्ञेयी हारपे ।
पाठी ज्ञेयचि ,' स्वरुपे ' । निखिल उरे ।। 52 ।।
तया नांव गा अधियज्ञु ' । ऐसे बोलिला जव सर्वज्ञु ।
तव , अर्जुन अतिप्राज्ञु । तया पातले ते ।। 53 ।।
हे जाणोनि म्हणितले देवे । ' पार्था ! परिसतु आहासि बरवे ? ! ' ।
या कृष्णाचिया बोलासवे ।येरु सुखाचा जाहला ।।54।।

1 जीव शरीर वगैरे
2 शुद्ध सोन्यात भेसळ झाली
3 हिणकस 4 भेसळ
5 पदर
6 पडदा 7 मर्यादा
8 जोडले
9 प्रथम 10 वैराग्यरुपी इंधनाची पुर्तता 11 इंद्रियरुपीअग्नी
12 चांगले पेटलेले
13 पृथ्वी14 आधार चक्ररुपी वृक्ष 15 चांगली
16 यज्ञातील ओटा
17 लहान मांडव
18 समारंभ

देखा,बालकाचिया धणि [1] धाइजे [2] । कां,शिष्याचेनि जाहलेपणे होइजें। 1 तृप्ती 2 तृप्त होणे
हे , सद् गुरुचि एकलेनि जाणिजे , । कां , प्रसवतिया [3] ।। 55 ।। 3 आई
म्हणौनि , सात्त्विक भावांची मांदी , । कृष्णाआंगी अर्जुनाआधी ।
न समातसे , परी बुद्धी । सांवरूनि, देवें ।। 56 ।।
मग पिकलिया सुखाचा परिमळु । कीं , निवालिया अमृताचा कल्लोळु ।
तैसा कोवळा आणि सरळु । बोलु बोलिला ।। 57 ।।
म्हणे ' परिसणेयांचिया राया ! ।आईके बापा, धनंजया ! ।
ऐसी , जळो सरलिया माया , ।तेथ जाळिते , तेही जळे ।। 58 ।।

**अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।**
**यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ।। 5 ।।**
**आणि जो अंतकाली माझेच स्मरण करीत देह सोडितो तो माझ्याच स्वरूपाला येउन पोचतो, यांत संशय नाही .**

जे आतांचि सांगितले होते । अगा ! ' अधियज्ञ ' म्हणितला जयाते , ।
जे आदीचि [4] तया माते । जाणोनि ; अंती ।। 59 ।। 4 आरंभीच
ते देह झोल [5] ऐसे मानुनी , । ठेले , आपणपे आपण होउनी । 5 खोटा
जैसा , मठ, गगना भरुनी । गगनीचि असे ।। 60 ।।
ये प्रतीतीचिया माजघरी [6]। तया निश्चयाची वोवरी । 6 अनुभवरुपी माज-घरातून
आली[7] , म्हणौनि बाहेरी । नव्हेचि से [8] ।। 61।। 7 दृढनिश्चयाच्या
ऐसे सबाह्य ऐक्य संचले , । मीचि होऊनि असता रचिले । खोलीत आले 8 इच्छा
बाहेरि भूतांची पांचही खवले । नेणतांचि , पडिली ! ।। 62 ।।
आतां उभेया उभेपण [9] नाही,जयाचे,। मा,पडिलिया गहन[10] कवण तयाचे ! ।
म्हणौनि , प्रतीतीचिये पोटीचे । पाणी न हाले ।। 63 ।। 9 दोघांना मी पणाचे भान
ते ऐक्याची आहे वोतिली [11] । की नित्यतेचिया हृदयी घातली । 10 संकट 11 घडली
जैसी , समरससमुद्री धुतली । रुळेचिना [12]।। 64।। 12 मळणे
पै अथावी [13] घट बुडला , । तो आंतबाहेरी उदके भरला । 13 खोल
पाठी , दैवगत्या जरी फुटला , । तरी उदक काय फुटे ? ।। 65 ।।
नातरी , सर्पे कवच सांडिले , । कां , उबारेने वस्त्र फेडिले , ।
तरी , सांग पां ! काय मोडले । अवेवामाजी ? ।। 66 ।।
तेसा,आकारु हा आहाच [14] भ्रंशे,। वाचूनी, वस्तु ते सांचलीचि [15] असें । 14 वरवरचा
तेचि बुद्धि जालिया ; विसकुसे [16] । कैसेनि आतां ? ।। 67 ।। 15 तशीच 16 गोंधळ
म्हणौनि ,यापरी माते । अंतकाळी जाणतसाते ।
जे मोकलिती [17] देहाते , । ते मीचि होती ।।68 ।। 17 सोडतात

एऱ्हवी तरी साधारण , । उरी आदळलिया मरण , ।
जो आठवु धरी अंतःकरण , । तेचि होईजें ।। 69।।
जेसा , कवणु एकु काकुळती , । पळता पवनगती , ।
दुपाउली अवचिती । कुहामाजी [1] पडियेला ।।70।। 1 विहिरीत
आतां , तया पडणयाआरौते [2]। पडण चुकवावया परौते । 2 पडण्याशीवाय
नाही ; म्हणौनि , तेथे । पडावेचि पडे ।।71।।
**तेवि , मृत्यूचेनि अवसरे , एके । जे येऊनि जीवासमोर ठाके , ।**
**' ते होणे ' मग न चुके । भलतयापरी [3] ।।72।।** 3 काही केले तरी
**आणि जागता जंव असिजे , । तव जेणे ध्याने भावना भाविजे , ।**
**डोळा लागतखेवो देखिजे । तेचि स्वप्नी ।। 73 ।।**

**यं यं वाऽपि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम् ।**
**तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः ।। 6 ।।**

**अथवा हे कौंतेया! सदा म्हणजे जन्मभर त्यांतच रंगुन गेल्यामुळे मनुष्य ज्या ज्या भावाचे स्मरण करीत अखेरीस देह सोडितो, त्या त्याच भावाला तो जाउन पोचतो.**

**तेवि जितेनि [4] अवसरे,। जे आवडोनि जीवी उरे [5] ,।** 4 जिवंत असताना 5इच्छित न
**तेचि मरणाचिये मेरे [6] ।फार हो लागे [7] ।।74 ।।** मिळाल्यामुळे अतृप्त असतो
आणि मरणी जया जे आठवे । तो तेचि गतीते पावे। 6 समयी 7 तीव्र होते
म्हणौनि सदा स्मरावे । मातेचि , तुवां ।।75।।

**तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।**
**मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ।।7।।**

**म्हणून सर्व काळी ( नेहमीच )माझे स्मरण करीत जा, आणि युद्ध कर. माझ्या ठायी मन व बुद्धि अर्पण केलीस म्हणजे लढाई करुनही मलाच येऊन पोचशील, यात संशय नाही.**

डोळा जे देखावे , । कां कानी हन ऐकावे , ।
मनी जे भावावे , । बोलावे वाचे , ।76।।
ते आतं बाहेरी आघवे ,।' मीचि करूनि घालावे ' ।
मग , सर्वी काळी स्वभावे । मीचि आहे ।।77।।
अर्जुना ! ऐसे जाहालिया , । मग न मरिजे , देह गेलिया ' ।
मा , संग्रामु केलिया , । भय काय तुज ? ।।78।।
तूं मन बुद्धि सांचेसी [8] । जरी माझिया स्वरूपी अर्पिसी , । 8 एकनिष्ट
तरी मातेचि गा पावसी । हे माझी भाक [9] ।।79।। 9 प्रतिज्ञा

हेचि कयिसया वरी होये ? । ऐसा , जरी संदेहो वर्ततु आहे , ।
तरी , अभ्यासूनि आदी पाहे , । मग , नव्हे , तरी कोपे ! ।।80।।

**अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।**
**परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिंतयन् ।।8।।**
**हे पार्था! चित्त दुसरीकडे जाऊं न देतां अभ्यासाच्या साहाय्याने स्थिर करून दिव्य परमपुरुषाचे ध्यान करीत असले म्हणजे त्याच पुरुषास जाऊन पोचतो.**

येणेचि अभ्यासेसी योगु [1] , । चित्तासि करी पां ! चांगु । — 1 कर्मयोग
अगा उपायबळे पंगु , ।पहाड ठाकी ।।81।।
तेविं ,सदभ्यासे , निरंतर । चित्तासि परमपुरुषाची मोहर [2] । — 2 मार्ग
लावी ; मग शरीर ।राहो अथवा जावो ।।82।।
जे नानागतीते [3] पावविते , । ते चित्त वरील आत्मयाते [4] । — 3 मार्ग 4आत्मरूप होणे
मग , कवण आठवी देहाते ।गेले ; की आहे ? ।।83।।
पै ,सरितेचेनि ओघे , । सिंधुजळा मीनले घोघे [5] । — 5 धो, धो करित
ते , काय वर्तत आहे मागे । म्हणौनि ' पाहो येती ? ' ।।84।।
ना , ते समुद्रचि होऊन ठेले । तेवि चित्ताचे चैतन्य जाहाले ।
जेथ यातयात [6] निमाले । घनानंद [7] जे।।85।। — 6येरझाऱ्या 7परमानंदस्वरूप

**कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मरेद्य ः ।**
**सर्वस्य धातारमचिन्त्यरुपमादित्यवर्णं तमसः परस्तात ।।9।।**
**कवि म्हणजे सर्वज्ञ,पुरातन,शास्ता,अणुपेक्षाहि धाकटा,सर्वांचा धाता म्हणजे आधार किंवा कर्ता, अचिंत्यस्वरुप व अंधकारापलीकडचा सूर्याप्रमाणे दैदीप्यमान अशा पुरुषाचे जो स्मरण-**

जयाचे आकारावीण असणे , ।जया जन्म ना निमणे ।
जे आघवेचि आघवेपणे । देखत असें ।।86।।
जे गगनाहूनि जुने । परमाणूहूनि साने ।
जयाचेनि सन्निधाने । विश्व चळे ।।87।।
जे सर्वांते यया विये । विश्व सर्व जेणे जिये ।
हेतु जया बिहे । अचिंत्य [8] जे ।।88।। — 8 कल्पनेपलीकडील
देखे ,वोळंबा [9] इंगळु [10] न चरे [11] ,। तेजी तिमिर न शीरे ,। — 9 वाळवी 10 विस्तव 11 ग्रासणे
जे दिहाचे अंधारे [12] , । चर्मचक्षुसी ।।89।। — 12 भरदिवसा अंधाराप्रमाणे अदृश्य
सुसडा [13] सूर्यकणांच्या राशी , । जो नित्य उदो ज्ञानियांसी । — 13 स्वच्छ
अस्तमानाचे जयासी । आडनाव नाही ।।90।।

**प्रयाणकाले मनसाऽचलेन भक्त्या युक्तो योगबलेन चैव ।**
**भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक् स तं परं पुरुषमुपैति दिव्यम् ।।10।।**

**अंतकाली इंद्रियनिग्रहरुप योगाच्या सामर्थ्याने व भक्तीने युक्त होत्साता मन स्थिर करुन आणि प्राण दोन्ही भुवयांचे मध्ये नीट ठेवून करील तो त्याच दिव्य परम पुरुषाप्रत पोचतो**

तया अव्यंगवाणेया [1] ब्रह्माते । प्रयाणकाले प्राप्ते , । — 1 निरामय
जो स्थिरावलेनि चित्ते । जाणोनि स्मरे , ।। 91।।
बाहेरी पद्मासन रचुनी ,। उत्तराभिमुख बैसोनि , ।
जीवी सुख , सूनि [2] । क्रमयोगाचे ।।92।। — 2 ठसवून
आंतु ,मीनलेनी मनोधर्मे ।स्वरुपप्राप्तीचेनि प्रेमे ।
आपेआप , संभ्रमे [3] । मिळावया ।।93।। — 3 उत्साहाने
आकळलेनि योगे , । ' मध्यमा मध्य मार्गे ' ।
अग्निस्थानौनि [4] निगे । ब्रह्मरंध्रा ।।94।। — 4 भृकुटीमधील अग्नीचक्र
तेथ अचेत [5] चित्ताचा सांगातु , ।आहाचवाणा [6] दिसे मांडतु । — 5 प्राण 6 वरवरचा
जेथ प्राणु गगनाआंतु । संचरे कां ।।95।।
परी मनाचेनि स्थैर्ये धरिला , । भक्तीचिया भावना भरला ।
योगबळे आवरला । सज्ज होऊनि ।।96 ।।
तो जडाजडाते [7] विरवितु । भ्रुलतामाजी संचरतु । — 7 अजड, चेतनायुक्त
जैसा , घंटानाद लयस्तु । घंटेसीच होय ।।+ 97।।
कां ,झांकलिया घटीचा दिवा । नेणिजे काय जाहला , केव्हा , ।
या रीती जो , पांडवा ! । देह ठेवी , ।।98।।
तो ,केवळ परब्रह्म । जया ' परमपुरुष ' ऐसे नाम ।
ते माझे निजधाम । होऊनि , ठाके ।।99।।

**यदक्षरं वेदविदो वदन्ति विशन्ति यद्यतयो वीतरागाः ।**
**यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ।।11।।**

**वेदवेत्ते जे अक्षर म्हणतात,वीतराग होऊन यति ज्यात प्रवेश करितात, आणि ज्याची इच्छा करून ब्रह्मचर्यव्रताचे आचरण करितात,ते पद म्हणजे ॐ कारब्रह्म तुला संक्षेपाने सांगतो.**

सकळा जाणणेयां जे लाणी [8] । तिये जाणिवेची जे खाणी । — 8 शेवट
तयां ज्ञानियांचिये आयणी [9]। जयाते अक्षरु म्हणिपे , ।।100।। — 9 बुद्धी
चंडवातेही न मोडे , । ते गगनचि की फुडे [10] ; । — 10 खरोखर
वांचूनि [11] , जरी होईल मेहुडे [12] । तरी उरेल कैचे ?।।101।। — 11नाहीतर 12 ढगच म्हणावे
तेवि,जाणणेया जे आकळिले,। ते जाणिवलेपणेचि उमाणले [13] । — 13 जाणले गेले
मग नेणवेचि ; तया म्हणितले । ' अक्षर ' सहजे ।।102।।

म्हणौनि , वेदविद नर । म्हणती जयाते अक्षर , ।
जे प्रकृतीसी पर ।परमात्मरुप ।।103।।
आणि विषयांचे विष उलंडुनि ।जे सर्वेन्द्रियां प्रायश्चित्त देऊनि ।
आहाति , देहाचिया बैसोनि । झाडातळी ।।104।।
ते ,यापरी, विरक्त । जयाची निरंतर वाट पाहात ;।
निष्कामासि अभिप्रेत [1]। सर्वदा जे ।।105।। 1 आवडते
जयाचिया आवडी [2] , । न गणिती ब्रह्मचर्याची सांकडी [3] ,। 2 अभिलाषा 3 संकटे
निष्ठुर होऊन , बापुडी [4] । इंद्रिये करिती ।।106।। 4 लीन करितात
ऐसे जे पद , । दुर्लभ आणि अगाध , ।
जयाचिये थडिये [5] वेद । चुबुकळिले [6] ठेले ।।107।। 5 तीर 6 गटांगळ्या खाणे
ते , ' ते पुरुष होती' । जे , यापरी लया जाती ।
तरी पार्था ! हेचि स्थिति । एक वेळ सांगो ' ।।108।।
तेथ अर्जुने म्हणितले ' स्वामी ! । हेचि म्हणावया होतो पां , मी ।
तव सहजे कृपा केली तुम्ही । तरी बोलिजो कां ; ।।109।।
परि बोलावे ते अति सोहोपे ' । तेथे म्हणितले त्रिभुवनदीपे ।
' तुज काय नेणो ? संक्षेपे । सांगेन ; ऐक ' ।।110।।
तरी,मना या बाहेरिलीकडे । यावयाची,साविया [7] सवे मोडे । 7 सहज
हे हृदयाचिया डोही बुडे । तैसे कीजें ।।111।।

**सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।**
**मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ।।12।।**

**सर्व इंद्रियरुपी द्वारांचे संयमन करून,आणि मनाचा हृदयात निरोध करून,आपला प्राण मस्तकात नेऊन समाधियोगात स्थित झालेला**

परी हे तरीच घडे , । जरी संयमाची अखंडे ।
सर्वद्वारी कवाडे । कळासती [8] ।।112।। 8 बंद करणे
तरी सहजे मन कोंडले , । हृदयीचि असेल उगले [9] । 9 स्वस्थ
जैसे , करचरणी मोडले , । परिवरु न संडी ।।113।।
' तैसे चित्त राहिलिया , पांडवा ! । प्राणाचा प्रणवुचि करावा ।
मग , अनुवृत्तिपंथे [10] आणावा । मूर्ध्निवरी ।।114।। 10 सुषुम्ना नाडी
तेथ , आकाशी मिळे न मिळे , । तैसा धरावा धारणाबळे ।
जव , मात्रात्रय [12] मावळे । अर्धबिंबी ।।+115।। 11 ओंकार
तंववरी , तो समीरु [11] । निराळी कीजे स्थिरु । 12 प्राणवायु
मग लग्नी[13] जेवी , ॐकारु ।बिंबीच विलसे ।।+116।। 13 एकरुप झाल्यावर

**ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।**
**यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ।।13।।**
**ॐ या एकाक्षर-ब्रह्माचा जप करीत व माझे स्मरण करीत जो देह सोडतो त्याला उत्तम गति मिळते.**

तैसें ' ॐ ' हे स्मरो सरे , । आणि , तेथेचि प्राणु पुरे ।
मग प्रणवांती उरे , । पूर्णघन [1] जे , ।।117।। 1समग्र
म्हणौनि प्रणवैकनाम । हे एकाक्षर ब्रह्म ।
जो माझे स्वरुप परम । स्मरतसांता ।।118।।
यापरी त्यजी देहाते , । तो, त्रिशुद्धी , पावे माते ।
जया पावणया परौते । आणिक पावणे नाही ।। 119।।
तेथ अर्जुना ! जरी विपाये,। तुझ्या जीवी,हन,ऐसे जाये,।
ना ,हे स्मरण मग होये । कायसयावरी अंती ? ।।120।।
इंद्रियां अनुघड [2] पडलिया,। जीविताचे सुख बुडालिया,। 2 अवरोध
आंतुबाहेरी उघडलिया । मृत्युचिन्हें ।।121।।
ते वेळी बैसावेचि कवणे ?। मग कवण निरोधी करणे ? ।
तेथ काह्याचेनि अंतःकरणे । प्रणव स्मरावा ? ।।122।।
तरि गा ऐशिया हो ! ध्वनी [3] । झणे ,थारा देशी हो मनी । 3 शंका
पै , नित्य सेविला, मी ; निदानी । सेवकु होय ।।123।।

**अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।**
**तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ।।14।।**
**मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ।**
**नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ।।15।।**
**हे पार्था!अनन्यभावाने सदासर्वदा जो माझे नित्यशः स्मरण करितो त्या नित्ययुक्त कर्म योग्यास मी म्हणजे माझी प्राप्ती सुलभ रीतीने होते.मला येउन मिळाल्यावर परम सिद्धि पावलेल्या महात्म्यास दुःखाचे घर व अशाश्वत असा पुनर्जन्म प्राप्त होत नाही.**

जे षियांसि तिळांजळी देउनी,। प्रवृत्तीवरी निगड [4] वाऊनि [5]। 4 कर्म प्रवृत्तिवर बेडी
माते हृदयी सूनि । भोगिताती ।। 124।। 5 घालून
परि , भोगितया आराणुका [6] , । भेटणे नाही क्षुधादिकां , । 6 समाधानाने
तेथ , चक्षुरादि रंकां । कवण पाडु ?।।125।।
ऐसे निरंतर एकवटले , । जे अंतःकरणी मजशी लिगटले ।
मीचि होऊनि , आटले [7] ।उपासिती ।।126।। 7 लीन
तयां देहावसान जै पावे , ।तै तिही माते स्मरावे , ।
मग,म्यां जरी पावावे,। तरि उपास्ति [8] ते कायसी ? ।।127।। 8 उपासना

पै , रंकु एक आडलेपणे , । काकुळती ' धाव गा धाव ' म्हणे , ।
तरि , तयाचिये ग्लानि , धावणे ।काय न घडे मज ? ।।128।।
आणि भक्ताही तेचि दशा ! । तरी भक्तीचा सोसु कायसा ? ।
म्हणौनि , हा ध्वनि ,ऐसा । न वाखाणावा [1] ।।129।। 1 थारा देऊ नकोस
तिही , जे वेळी मी स्मरावा , । ते वेळी , स्मरिला की पावावा ।
तो आभारुही [2] जीवा । साहवेचि ना ।।130।। 2 ओझे
ते ऋणवैपण देखोनि आंगी , । मी आपुलियाचि उत्तीर्णत्वालागी [3] , । 3 उतराईकरता
भक्ताचिया तनुत्यागी । परिचर्या करी ।।131।।
देहवैकल्याचा [4] वारा । झणे लागेल या सुकुमारा , । 4 व्याकुळता
म्हणौनि , आत्मबोधाचिया पांजिरा [5] । सूये तयाते ।।132।। 5 कवच
वरी आपुलिया स्मरणाची उवाइली [6] । हीव ऐसी , करी साउली । 6 आल्हाददायक
ऐसेनि , नित्य बुध्दि संचली , । मी आणी तयाते ।।133।।
म्हणौनि , देहांतीचे सांकडे , । माझिया कहीचि न पडे ।
मी आपुलियाते , आपुलीकडे , । सुखेचि आणि ।।134।।
वरचील देहाची गवसणी फेडुनी , । आहाच अहंकाराचे रज झाडुनी , ।
शुद्ध वासना निवडुनी , । आपणपा मेळवी ।।135।।
आणि भक्ता तरी , देही । विशेष एकवंकीचा [7] ठावो [8] नाही ,। 7 ऐक्यतेचा 8 थांग
म्हणौनि अव्हेरु करिता , ' कांही ।वियोगु ' ऐसा ना वाटे ।।136।।
नातरी , देहांतीचि मिया यावे , । मग आपणपे याते न्यावे , ।
हे ही नाही , ' स्वभावे । जे आधीचि मज मीनले ' ।।137।।
येरी , शरीराचिया सलिली ।असतेपण , हे साउली ।
वाचूनि , चंद्रिका ते ठेली ।चंद्रीच आहे ।।138।।
ऐसे जे नित्ययुक्त , । तयासि सुलभ मी सतत ।
म्हणौनि , देहांती निश्चित । मीचि होती ।।139 ।।
मग क्लेशतरुची वाडी । जे तापत्रयाग्नीची सगडी [9] । 9 शेगडी
जे , मृत्युकाकासी कुरोडी [10] । सांडिली आहे ।।140।। 10 ओवाळून टाकलेला
जे दैन्याचे दुभते।जे महाभयाते वाढविते ।
जे सकळ दुःखाचे पुरते । भांडवल ।।141।।
जे दुर्मतीचे मूळ ।जे कुकर्माचे फळ ।
जे व्यामोहाचे [11] केवळ । स्वरुपचि ।।142।। 11भ्रम
जे संसाराचे बैसणे । जे विकारांचे उद्याने(उदाणे) ।
जे सकळ रोगांचे भाणे [12] ।वाढिले आहे ।। 143।। 12 ताट
जे काळाचा खिचु [13] उशिटा [14] । जे आशेचा आंगवठा [15] । 13 खिचडी 14 उष्टे
जन्ममरणाचा वोलिवटा [16] । स्वभावे जें ।।144।। 15 मूर्ती 1 6 वाहती वाट

जे भुलीचे भरिव । विकल्पाचे वोतिव ।
किंबहुना ! पेव । विंचुवांचे ।। 145 ।।
जे व्याघ्राचे क्षेत्र । जे पण्यांगनेचे [1] मैत्र । 1 वैश्या
जे विषयविज्ञानयंत्र ।सुपुजित ।।146।।
जे लावेचा [2] कळवळा ।निवालिया विषोदकाचा गळाळा [3] । 2 हडळ 3 घोट 4 मूर्ती
जे विश्वासु आंगवळा [4] ।संवचोराच [5] ।।147।। 5सोबतीचा संभावित चोर
जे कोढियाचे [6] खेव [7] । जे काळसर्पाचे मार्दव । 6 कोड असलेला
गोरियेचे [8] स्वभाव । गायन जे ।।148।। 7 आलिंगन 8 पारध्याचे
जे वैरियाचा पाहुणेरु । जे दुर्जनाचा आदरु ।
हे असो ; जे सागरु । अनर्थाचा ।।149।।
जे स्वप्नी देखिले स्वप्न । जे मृगजळे सासिन्नले वन ।
जे धूम्ररजांचे गगन । ओतले आहे ।।150।।
ऐसे जे हे शरीर , । ते , ते न पवतीचि पुढती नर ।
जे होऊनि ठेले अपार , । स्वरुप माझे ।।151।।

**आब्रह्मभुवनाल्लोकाःपुनरावर्तिनोऽर्जुन ।**
**मामुपेत्य तु कौंन्तेय पुनर्जन्म न विद्यते ।।16।।**

**हे अर्जुना!ब्रह्मलोकासुध्दा(स्वर्गादि)जे लोक आहेत तेथून (कें‌व्हातरी यालोकी) पुनरावर्तन (परत फिरणे भाग) आहे.पण हे कौंतेया !मला येऊन मिळाले म्हणजे पुनर्जन्म नाही.**

एऱ्हवी , ब्रह्मपणाचिये भडसे [9] । न चुकतीचि पुनरावृत्तीचे वळसे । 9 थोरपणा
परि , निवटलियाचे [10] जैसे । पोट न दुखे ,।।152।। 10 मृत
नातरी , चेइलियानंतरे , । न बुडिजे स्वप्नीचेनि महापुरे, ।
तेवी ; माते पावले , ते संसारे । लिंपतीचि ना ।।153।।
एऱ्हवी ,जगदाकाराचे सिरे [11] । जे चिरस्थायीयांचे धुरे [12] । 11 शीरोभाग 12 प्रमुख
ब्रह्मभुवन गा ! चवरे [13] । लोकाचळाचे ।।154।। 13 शीखर
जिये गावीचा पहारु [14] ,दिवोवरी ,। एका अमरेंद्राचे आयुष्य न धरी । 14 प्रहर
विळोनि [15] पांती [16] ऊठी एकसरी । चवदाजणांची ! ।।155।। 15 एका दिवसात16 पंगत

**सहस्त्रयुगपर्यन्तमहर्यद् ब्रह्मणो विदुः ।**
**रात्रिं युगसहस्त्रान्तां तेऽहोरात्रविदो जना ः ।।17।।**

**अहोरात्र म्हणजे काय हे तत्वत ः जाणणारे पुरुष कृत,त्रेता,द्वापार व कलि ही चार युगे मिळून एक महायुग व अशा हजार महायुगांचा जो काल तो ब्रह्मदेवाचा एक दिवस ,आणि तसल्याच हजार युगांची त्याची एक रात्र होते, असे समजतात.**

जै चौकडिया [1] सहस्त्र जाये , । तै ठाये ठावो [2] विळुचि [3] होये । 1 चार युग 2 जातात तेव्हां
आणि , तैसेचि सहस्त्रवरिये , पाहे [4] , ।रात्री जेथ ।।156।। 3 दिवस होतो 4 पहाट
येवढे अहोरात्र जेथिचे, । तेणे न लोटती [5] जे भाग्याचे । 5 मरत नाहीत
देखती , ते स्वर्गीचे । चिरंजीव ।।157।।
येरा सुरगणांची नवाई , । विशेष सांगावी येथ काई ? ।
मुद्दल इंद्राचीचि दशा पाही ! । जे दिहाचे चौदा ! ।।158।।
परि , ब्रह्मयाचियाहि आठा पाहाराते , । आपुलिया डोळा देखते ।
जे आहाति , गा ! तयाते । अहोरात्रविद म्हणिपे ।।159।।

**अव्यक्ताद्व्यक्तय :सर्वा : प्रभवन्त्यहरागमे ।**
**रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ।।18।।**
**भूतग्राम : स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते ।**
**रात्र्यागमेऽवश : पार्थ प्रभवत्यहरागमे ।।19।।**

**हा ब्रह्मदेवाचा दिवस सुरु झाला म्हणजे अव्यक्तापासून सर्व व्यक्त पदार्थ निर्माण होतात आणि रात्र सुरु झाली म्हणजे त्याच पूर्वोक्त अव्यक्तांत लय पावतात. भूतांचा तोच हा समुदाय याप्रमाणे पुनः पुनः जन्मून अवश होत्साता , म्हणजे स्वतः इच्छा असो वा नसो , यंत्रात घातल्याप्रमाणे रात्र सुरु झाली की लय पावतो , आणि हे पार्था! दिवस सुरु झाला की पुनः जन्मतो.**

तये ब्रह्मभुवनी दिवसे पाहे , । ते वेळी , गणना केही [9] न समाये , । 9 कोठेच
ऐसें ' अव्यक्ताचे ' होये । ' व्यक्त विश्व ' ।। 160।।
पुढती , दिहाची चौपाहारी [10] फिटे , । आणि हा आकारसमुद्र आटे । 10 चार प्रहर
पाठी तैसाचि , मग , पाहाटे । भरो लागे ।।161।।
शारदीयेचिये प्रवेशी , । अभ्रे जिरती आकाशी ।
मग , ग्रीष्मांती जैशी । निगती पुढती ।।162।।
तैशी ,ब्रह्मदिनाचिये आदी , । हे भूतसृष्टीची मांदी ।
मिळे , जंव सहस्त्रावधी । निमित्त पुरे(निमति युगे ) , ।।163।।
पाठी रात्रीचा अवसरु होये , । आणि विश्व अव्यक्ती लया जाये ।
तोही युगसहस्त्र मोटका [11] पाहे , । आणि तैसैचि रचे ।।164 ।। 11.अल्प
हे सांगावया काय उपपत्ती ? । जे जगाचा प्रळयो आणि संभूती [12] । 12 उत्पत्ती
इये ब्रह्मभुवनीचिया होती । अहोरात्रामाजी ।।165।।
कैसे थोरिवेचे मान ; पाहे पां ! । जो सृष्टिबीजाचा साटोपा [13] । 13 कोठार
परि पुनरावृत्तीचिया मापा । शीग [14] जाहाला ।।166।। 14 टोक
एऱ्हवी , त्रैलोक्य हे , धनुर्धरा ! । तिये गावीचा गा ! पसारा ।
तो हा , दिनोदयी एकसरा ।मांडतु असे ।।167।।

पाठी , रात्रीचा समो [1] पावे , । आणि , अपैसाचि साठवे ।  1 समयी
म्हणिये , जेथिचे तेथ स्वभावे । साम्यासी ये ।।168।।
जैसे , वृक्षपण बीजासि आले , । की . मेघ हे गगन जाहाले , ।
तैसे , अनेकत्व जेथ सामावले , । ते , साम्य म्हणिपे ।। 169।।

**परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः ।**
**यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ।।20।।**
**पण वर सांगितलेल्या अव्यक्तापलीकडचा दुसरा सनातन अव्यक्त पदार्थ,जो सर्व भूते नाहीशी झाली तरीहि नाहीसा होत नाही.**

तेथ समविषम न दिसे कांहीं , । म्हणौनि , भूते हे भाष नाही ।
जेवि , दूधचि जाहालिया दही । ' नामरुप जाय ' ।।170।।
तेवि आकारलोपासरिसे , ।जगाचे जगपण भ्रंशे ।
परि , जेथे जाहाले ते जैसे । तैसेचि असे ।।171।।
तै , तया नांव सहज अव्यक्त । आणि , आकारावेळी तेचि व्यक्त ।
हे एकास्तव एक सूचित [2]। एऱ्हवी दोनी नाही ।।172।।  2 दाखवणे
जैसे , आटलिया रुपे , । आटलेपण ते ' खोटी ' [3] म्हणिपे ।  3 लगड
पुढती तो घनाकारु हारपे । जे वेळी अलंकार होती ।।173।।
ही दोही जैशी , होणी ।एकी साक्षिभूत सुवर्णी ।
तैसी , व्यक्ताव्यक्ताची कडसणी [4]। वस्तुच्या ठायी ।।174।।  4 विचार
ते तरी व्यक्त ना अव्यक्त , । नित्य ना नाशवंत ।
या दोही भावाअतीत । अनादिसिध्द ।।175।।
जे हे विश्वचि होऊनि असे ,। परि विश्वपण नासिलेनि न नासे , ।
अक्षरे पुसिल्या न पुसे , । अर्थु जैसा ।।176।।
पाहे पा ! ,तरंग तरी होत जात , । परि तेथ उदक ते अखंड असत ।
तेवी , भूताभावी न नाशत । अविनाश जे ।।177।।
नातरी , आटतिये अळंकारी ।नाटते , कनक असे जयापरी , ।
तेवी , मरतिये जीवाकारी । अमर जे आहे ।।178।।

**अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् ।**
**यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परम मम ।।21।।**
**पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ।**
**यस्यान्तः स्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ।।22।।**
**ज्या अव्यक्ताला अक्षर म्हणतात तोच परम म्हणजे उत्कृष्ट किंवा अखेरची गति म्हंटली आहे व ज्याला जाऊन पोचले असता फिरुन जन्मास येत नाही असे माझे परम स्थानहि तेच होय. हे पार्था! ज्याच्या आंत सर्व भूते आहेत व ज्याने हे सर्व विस्तारले किंवा व्यापले आहे तो पर म्हणजे श्रेष्ठ पुरुष अनन्यभक्तीनेच लभ्य होय.**

जयाते अव्यक्त म्हणो ये कोडे , । म्हणता , स्तुति हे ऐसे नावडे ।
जे मनाबुद्धी न सांपडे । म्हणौनिया ।।179।।
आणि आकारा आलिया जयाचे । निराकारपण न वचे ।
आकार लोपे न विसंचे [1] । नित्यता गा ।।180।। 1 बीघडणे
म्हणौनि , अक्षर जे म्हणिजे , ।तेवीचि म्हणता बोधुहि उपजे ।
जयापरौता पैसु[2] न देखिजें। या नाम ,' परमगती ' ।।181।। 2 प्रवृत्ती
परि , आघवा इही देहपुरी ।आहे , निजेलियाचे परी ।
जे , व्यापारु करवी ना करी, । म्हणौनिया ।।182।।
एऱ्हवी जे शारीरचेष्टा , । त्यामाजी एकही न ठके गा , सुभटा ! ।
दाही इंद्रियांचिया वाटा । वाहतचि आहाती ।। 183 ।।
उकलूनि विषयांचा पेटा । होत मनाचा चोहटा ।
तो सुखदुःखाचा राजवांटा [3] । भीतराहि पावे ।।184।। 3 उच्च प्रतीचा भाग
परि रावो पहुडलिया सुखे , । जैसा देशीचा व्यापारु न ठके , ।
प्रजा आपुलालेनि अभिलाखे , । करितचि असती ।।185।।
तैसें , बुद्धिचे , हन , जाणणे , । का,मनाचे घेणे देणे , ।
इंद्रियांचे करणे । स्फुरण वायूचे ।।186।।
हे देहक्रिया आघवी ।' न करवितां होय ' बरवी ।
जैसा , न चलवितेनि , रवी । लोकु चाले ।।187।।
अर्जुना ! तयापरी, । सुतला [4] ऐसा आहे शरीरी । 4 निजला
म्हणौनि , ' पुरुषु ' गा ! अवधारी । म्हणिपे जयाते ।।188।।
आणि प्रकृति पतिव्रते । पडिला एकपत्नीव्रते ।
येणेहि कारणे जयाते । ' पुरुषु ' म्हणो ये ।।189।।
पै , वेदाचे बहुवसपण । देखेचिना जयाचे आंगण , ।
हे गगनाचे पांघरुण । होय देखा ! ।।190।।
ऐसे जाणूनि , योगीश्वर । जयाते म्हणती ' परात्पर [5] ' । 5 परमेश्वर
जे अनन्यगतीचे [6] घर ।गिवसीत [7] ये ।।191।। 6 एकनिष्ट 7 शोधीत
जे, तनु, वाचा, चित्ते । नाइकती दुजिये गोष्टीते ।
तयां एकनिष्ठेचे पिकते । सुक्षेत्र जे।।192।।
' हे त्रैलोक्यचि पुरुषोत्तमु ' । ऐसा साच जयाचा मनोधर्मु ।
तया आस्तिकाचा आश्रमु । पांडवा गा ! ।।193।।
जे निगर्वाचे [8] गौरव । जे निर्गुणाची जाणिव । 8 गर्वरहित
जे सुखाची राणिव । निराशांसी ।।194।।

जे संतोषिया वाढिले ताट । जे अचिंता [1] अनाथांचे मायपोट । 1 चिंता न करणारा
' भक्तीसी उजू वाट ' । जया गावा ।। 195।।
हे एकैक सांगोनि , वाया । काय फार करु ? धनंजया ! ।
पै , गेलिया जया ठाया , । तो ठावोचि होईजे ।।196।।
हिवाचिया झुळुका , । जैसे , हिवचि पडे उष्णोदका ।
कां , समोर जालिया अर्का , । तमचि प्रकाशु होय ।।197।।
तेसा , संसारु जया गांवा । गेला सांता , पांडवा ! ।
होऊनि ठाके आघवा । मोक्षाचाची ।।198।।
तरी , अग्नीमाजी आले , । जैसे , इंधनचि अग्नी जहाले , ।
पाठी न निवडेचि; काही केले ।काष्टपण ।।199।।
नातरी , साखरेचा माघौता । बुद्धिमंतपणेही करिता ।
परि ऊंस नव्हे , पंडुसुता ! । जियापरी ।।200।।
लोहाचे कनक जाहले । हे एके परिसेचि केले ।
आता आणिक कैचे , ते गेलें । लोहत्व, आणी ।।201।।
म्हणौनि,तूप होऊनि माघौते,। जेवी,दूधपणा न येचि निरुते [2] । 2 निश्चितपणे
तेवी , पावोनिया जयाते । पुनरावृत्ति नाही ।।202।।
ते माझे परम , । साचोकारे , निजधाम ।
हे आंतुवट [3] , तुज , वर्म । दाविजत असे ।। 203 ।। 3 अंतरंगातील

**यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिन : ।**
**प्रयाता यान्ति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ।।23।।**

**आता कर्मयोगी ज्या काळी मरण पावले असता परत या लोकी जन्मास येत नाहीत, आणि ज्या काळी मरण पावले असता परत येतात , तो काल भरतश्रेष्ठा! तुला सांगतो.**

तेवीचि , आणिकेही एके प्रकारे , । हे जाणता आहे सोपारे ,।
तरि देह सांडितेनि अवसरे , । जेथ मिळती योगी ।।204।।
अथवा अवचटे ऐसे घडे , । जे अवसरे देह सांडे ।
तरि , माघौते येणे घडे । देहासीचि ।। 205।।
म्हणौनि,काळशुध्दी जरी देह ठेविती,। तरी,ठेवितखेवी ब्रह्मचि होती ।
एऱ्हवी , अकाळी , तरी येती । संसारा पुढती ।।206।।
तैसे सायुज्य [4] आणि पुनरावृत्ती ।या दोन्ही,अवसराआधीन आहाती । 4 चौथा मोक्ष
तोचि ' अवसरु 'तुजप्रती । प्रसंगे सांगो ।।207।।
तरि ऐके गा सुभटा ! । पातलिया मरणाचा माजिवटा [5] । 5 ग्लानी
पांचै आपुलालिया वाटा । निघती अंती ।।208।।

ऐसा वरिपडिला[1] प्रयाणकाळे ,। बुद्धीते भ्रमु न गिळी । 1 प्राप्त होणे
स्मृति नव्हे आंधळी , । न मरे मन ।।209।।
हा चेतना वर्गु आघवा , । मरणी दिसे टवटवा ।
परि अनुभविलिया ब्रह्मभावा ।गंवसणी होऊनि ।।210।।
ऐसा सावध हा समवावो[2] । आणि निर्वाणवेऱ्ही निर्वाहो[3] । 2 समुदाय
हे तरीच घडे , जरी सावावो[4] । अग्नीचा आथी ।।211।। 3 टिकतो 4 साह्य
पाहां पां ! वारेने , कां उदके , । जै दिवियाचे दिवेपण झाके , ।
तै , असतीच , काय देखे । दिठी आपुली ? ।।212।।
तैसे , देहांतीचेनि विषमवाते[5] । देह आत बाहेरी श्लेष्माआंते[6] , । 5 त्रिदोष 6 कफयुक्त
तै , विझोनि जाय उजिते[7] । अग्नीचे ते ।।213।। 7 तेज
ते वेळी , प्राणासि प्राणु नाही । तेथ बुद्धि असोनि करील काई ? ।
म्हणौनि , अग्नीविण देही , । चेतना न थारे ।।214।।
अगा ! देहीचा अग्नी जरी गेला , ।तरी देह नव्हे , चिखलु वोला ।
वाया , आयुष्यवेळु , आपला । आंधारे गिवसी ।।215।।
आणि मागील स्मरण आघवे , । ते तेणे अवसरे सांभाळावे ।
मग , देह त्यजूनि मिळावे । स्वरूपी कीं ।।216।।
तंव तया श्लेष्माचे चिखली । चेतनाचि बुडोनि गेली ।
तेथ , मागिली पुढिली , हे ठेली[8] । आठवण सहजे ।।217।। 8 संपली
म्हणौनि,आधी अभ्यासु जो केला,। तो मरण न येतांचि निमोनि गेला ! ।
जैसे , ठेवणे न दिसता , मालवला । दीपु हातीचा ।।218।।
आता असो हे सकळ ; । जाण पां ! ज्ञानासि अग्नि मूळ ।
तया अग्नीचे प्रयाणी बळ । संपूर्ण आथी ।।219।।

**अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।**
**तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्विदो जनाः ।।24।।**

**अग्नि,ज्योति म्हणजे ज्वाळा,दिवस,शुक्लपक्ष,उत्तरायणाचे सहा महिने, यात मेलेले ब्रह्मवेत्ते लोक मेल्यावर ब्रह्मास पोचतात(परत येत नाहीत)**

आंत अग्नीज्योतीचा प्रकाशु । बाहेरी शुक्लपक्षु आणि दिवसु ।
आणि सामासांमाजी मासु । उत्तरायण ।।220।
ऐशिया समयोगाची ' निरुती[9]। लाहोनि ' जे देह ठेविती , । 9 अनुकुल परिस्थितीची
ते ब्रह्मचि होती । ब्रह्मविद ।।221।। प्राप्ती
अवधारी गा धनुर्धरा ! । येथवरी सामर्थ्य यया अवसरा ।
तेवीचि , हा उजु मार्ग , स्वपुरा ।यावया पै ।।222।।

एथ अग्नी हे पहिले पायतरे , । ज्योतिर्मय हे दुसरे ।
दिवस जाणे तिसरे । चौथे शुक्लपक्ष ।।223।।
आणि सामास उत्तरायण ।ते , वरचील गा ! सोपान ।
येणे सायुज्यसिद्धिसदन ।पावती योगी ।।224।।
हा उत्तम काळु जाणिजे । याते 'अर्चिरा-मार्गु ' म्हणिजे ।
आतां ,अकाळु , तोही सहजें। सांगेन ; आईक ।।25।।

**धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ।**
**तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ।।225।।**
**अग्नि,धूर,रात्र,तसेच कृष्णपक्ष,दक्षिणायनाचे सहा महिने,यात मेलेला कर्मयोगी चंद्राच्या तेजास म्हणजे चंद्रलोकास जाऊन पुण्यांश सरल्यावर परत येतो.**

तरी , प्रयाणाचिया अवसरे , । वातश्लेष्मां सुभरे [1] । 1 अतीशय भर
तेणे अंतःकरणी आंधारे । कोंदले ठाके ।। 226।।
सर्वेंद्रिया लांकुड पडे [2] । स्मृति भ्रमामाजी बुडे । 2 जडत्व येते
मन होय वेडे ,। कोंडे प्राण ।।227।।
अग्निचे अग्निपण जाये , । मग तो धूमचि अवघा होये , ।
तेणे चेतना गिवसिली ठाये [3] । शरीरीची [4] ।।228।। 3 गुंतून पडते 4 शरीरातच
जैसे चंद्राआड , आभाळ ।सदट [5] दाटे सजळ [6] । 5 दाट 6 जलयुक्त ढग
मग , गडद , ना उजाळ , । ऐसे झांवळे होय ।।229।।
कां , मरे ,ना सावध , । ऐसे जीवितासि पडे स्तब्ध ।
आयुष्य मरणाची मर्याद । वेळु ठाकी ।।230।।
ऐसी मनबुद्धि करणी । सभोवती धूमाकुळाची कोंडणी ।
तेथ जन्मे जोडलिये वाहणी [7] । युगचि बुडे ।।231।। 7 पध्दत
हा ंगा ! हातीचे जे वेळी जाये,।ते वेळी,आणिका लाभाची गोठी के आहे ? ।
म्हणौनि , प्रयाणी तंव होये । येतुली दशा ! ।।232।।
ऐशी देहाआंतु स्थिती , । बाहेरि कृष्णपक्षु , वरि राती ।
आणि सामासही वोडवती । दक्षिणायन ।। 233।।
इये पुनरावृत्तीची घराणी । आघवी एकवटती , जयाचिया प्रयाणी , ।
तो स्वरुपसिद्धीची काहाणी[8] । केसेनि आइके ? ।।334।। 8 ब्रह्मस्वरूप स्थितिची गोष्ट
ऐसा जयाचा देह पडे , । तया ,' योगी म्हणौनि ' चंद्रवरी जाणे घडे ।
मग तेथूनि मागुता बहुडे [9] । संसारा ये ।।235।। 9 मागे फिरतो
आम्ही अकाळु जो पांडवा ! ।म्हणितला , तो हा जाणावा ।
आणि हाचि धूम्रमार्गु , गांवा । पुनरावृत्तीचिया ।।236।।

येर तो ' अर्चिरा मार्गु ' । तो वसता [1] आणि असलगु [2] । 1 रुळलेला 2 अगदी
साविया [3] , स्वस्त , चांगु । निवृत्तीवरी ।। 237।। निराळा 3 सहज

**शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते ।**
**एकया यात्यनावृत्तिमन्ययाऽऽवर्तते पुनः ।।26।।**
**याप्रमाणे शुक्ल व कृष्ण म्हणजे प्रकाशमय व अंधकारमय अशा जगताच्या दोन शाश्वत गति म्हणजे कायमचे मार्ग मानिले आहेत.एका मार्गाने गेले म्हणजे परत फिरत नाही,व दुसऱ्याने पुनः परत येतो.**

ऐशिया अनादि या दोन्ही वाटा । एकी उजू , एकी अव्हांटा ।
म्हणौनि , बुद्धिपूर्वक सुभटा ! । दाविलिया तुज ।।238।।
कां , जे मार्गामार्ग देखावे , । साच लटिके वोळखावे ,।
हिताहित जाणावे , । हिताचिलागी ।।239।।
पाहे पां ! नाव देखता बरवी,।कोणी आड घाली [4] काय अथावी [5] ?। 4 उडी घालणे 5 अथांग
कां , सुपंथ जाणौनिया , अडवी [6] ।रिगवत असे ? ।।240।। पाण्यात 6 अरण्य
जो विष , अमृत ओळखे , । तो अमृत काय सांडू शके ? ।
तेवि , जो उजू वाट देखे , । तो , अव्हाटा न वचे ।।241।।
म्हणौनि , फुडे [7] । पारखावे खरे , कुडे [8] । 7 नीट पारख करावी
पारखिले , तरी न पडे । अनवसरे कही ।।242।। 8 खोटे
एऱ्हवी देहांती , थोर विषम । या मार्गाचे आहे संभ्रम ।
जन्मे अभ्यासिलियाचे , हन , काम ।जाईल वायां ।।243 ।।
जरी अर्चिरा मार्गु चुकलिया । अवचटे धूम्रपंथे पडलिया ।
तरी , संसारपांथी जुंतलिया [9] । भंवतचि असावे ।।244।। 9 जुंपणे
हे सायास देखोनि मोठे , । आता कैसेनि पां एकवेळ फिटे[10] , । 10 एकदम नष्ट होणे
म्हणौनि , योगमार्गु गोमटे । शोधिले दोन्ही ।।245।।
तंव एके ब्रह्मत्वा जाइजे , । आणि , एके पुनरावृत्ति येईजें ।
परि , दैवगत्या जो लाहिजे , । देहांती जेणे ।।246।।

**नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन ।**
**तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ।।27।।**
**हे पार्था!या दोन सृति म्हणजे मार्ग तत्वतः जाणणारा कोणताहि कर्मयोगी मोह पावत नाही; म्हणून हे अर्जुना ! तूं सर्वकाल कर्मयोगयुक्त हो.**

ते वेळी , म्हणितले हे नव्हे [11] । वाया ,अवचटे काय पावे । 11 मनाप्रमाणे होत नाही
देह त्यजूनि वस्तु [12] होआवे। मार्गेचि की ! ।।247।। 12 ब्रह्मत्वास जावे की

तरी आता देह असो अथवा जावो,।आम्ही तो केवळ वस्तुचि आहो । 1 ब्रह्म
कां , जे दोरी सर्पत्व वावो [2] । दोराचिकडुनी ।।248।। 2 सर्पत्वाचा खोटा भास
मज तरंगपण असे की नसे , । ऐसे हे उदकासी कही प्रतिभासे [3] ? । 3 वाटणे
ते भलतेव्हा जैसे तैसें । उदकचि कीं ।।249।।
तरंगाकारे न जन्मेचि , । ना , तरंगलोपे न निमेचि ।
तेवि , देही , जे देहेचि ।वस्तु जाहले , ।।250।।
आतां ,शरीराचे तयाचिया ठाई । आडनांवही उरले नाही ।
तरी कोणे काळे ,काई । निमे ? ते पाहे पां ! ।।251।।
मग मार्गाते कासया शोधावे ? । कोणे ,कोठूनि ,के जावे ? ।
जरी , देशकालादि आघवे । आपणचि असे ।।252 ।।
आणि हां गा ! घटु जे वेळी फुटे , । ते वेळी , तेथिचे आकाश लागे नीट वाटे ।
वाटा लागे ' तरी गगना भेटे ' । एऱ्हवी चुके ? ।।253।।
पाहे पां ! ऐसे , हन , आहे ।की ,तो आकारुचि जाये , ।
येर गगन ते गगनीचि आहे , । घटत्वाहि आधी ।।254।।
ऐसिया बोधाचेनि सुरवाडे [4] , । मार्गामार्गाचे सांकडे [5] । 4 रेलचेल 5 संभ्रम
तया सोऽहंसिध्दा न पडे ।योगियांसी ।।255।।
याकारणे पंडुसुता ! । तुवा होआवे योगयुक्ता ।
येतुलेनि , सर्वकाळी साम्यता ।आपैसया होईल ।।256।।
मग , भलतेथ , भलतेंव्हा । देह असो ,अथवा जावा ।
परि , ' अबंधा नित्य ब्रह्मभावा [6] ' । विघडु [7] नाही ।।257।। 6 अर्निबंध नित्य ब्रह्मभावास
तो कल्पादि जन्मा नागवे [8] ।कल्पांती मरणे नाप्लवे [9] । 7 बीघाड 8 असाध्य 9 न बुडणे
माजी , स्वर्गसंसाराचेनि लाघवे [10] ।झकवेना [11] ।। 258।। 10 चलाखी 11 फसत नाही
येणे बोधे जो योगी होये , । तयासीचि या बोधाचे नीटपण आहे ।
कां , जे भोगाते पेलूनि , पाये । निजरूपा ये ।।259।।
पै गा ! इंद्रादिका देवां । जया सर्वस्वे गाजती [12] राणिवा [13] । 12 दुमदुमणे 13 राज्य
ते सांडणे मानूनि , पांडवा ! । डावली [14] जो ।।260।। 14 डावलतो

**वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् ।**
**अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ।।28।।**

**हे वर सांगीतलेले तत्व जाणितले म्हणजे वेदामध्ये,यज्ञामध्ये,तपामध्ये आणि दानामध्ये जे पुण्यफल सांगितले आहे ते सर्व कर्मयोगी मागे टाकितो आणि त्याच्या पलीकडल्या आद्य स्थानाला जाऊन पोचतो.**

जरी वेदाध्ययनाचे जाले । अथवा , यज्ञाचे शेतचि पिकले ।
कीं ,तपोदानाचे जोडले । सर्वस्व , हन , जे ।।261।।

तया आघवयाचि पुण्याचा मळा । भारु आंतौनि [1] जया ये फळा , । 1 आतमधील बहराने
ते ' परब्रह्मा निर्मळा । साटि ' [2] न सरे ।।262।। 2 तुलना
जे , नित्यानंदाचेनि माने , । उपमेचा कांटाळा [3] , न दिसे साने । 3 तुलनेत
पाहा पां ! वेदयज्ञादि साधने । जया सुखा ।।263।।
जे विटे ना सरे, । भोगी, तयाचेनि पवाडे पुरे[4] । 4 इच्छापुर्ति होते
पुढती , महासुखाचे सोयरे । भावंडचि ।।264।।
ऐसे दृष्टीचेनि सुखपणे , । जयासी अदृष्टाचे बैसणे ।
जे , शतमखाही आंगवणे [5] । नोहेचि एका ।।+265।। 5 शंभर यज्ञाने पण
तयाते योगीश्वर अलौकिके । दिठीचेनि , हाततुके [6] । स्वधीन होणे 6 हाताने
अनुमानती कौतुके , । तंव , हळुवट [7] आवडे ! ।।266।। तोलून 7 हलके
मग , तया सुखाची , किरीटी ! । करूनिया गा ! पाउटी [8] । 8 पायरी
परब्रह्माचिये पाठी । आरुढती ' ।।267।।
ऐसें , चराचरैक भाग्य , । जे , ब्रह्मेशां आराधना योग्य ,।
योगियांचे भोग्य । भोगधन जे , ।।268।।
जो सकळ कळांची कळा । जो परमानंदाचा पुतळा ।
जो जिवाचा जिव्हाळा । विश्वाचिया ,।।269।।
जो सर्वज्ञतेचा वोलावा । जो यादवकुळीचा कुळदिवा ।
तो श्रीकृष्णजी , पांडवा-। प्रती बोलिला ।। 270।।
ऐसा कुरु क्षेत्रीचा वृत्तांतु , । संजयो रायासी असे सांगतु ।
तेचि परियेसा पुढारी मातु ' [9] । ज्ञानदेव म्हणे ।।271।। 9 उत्तम गोष्ट

**इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अक्षरब्रह्मयोगो नाम अष्टमोऽ ध्यायः ।।8।।**

## कठीण ओव्यांचा अर्थ

22. निर्विकल्प म्हणजे नित्य,शुध्द(21व्या ओवितील 'अमूर्त विशुध्द)अशा परमात्म्याच्या ठायी जो आदिसंकल्पाचा अंकुर (एकोऽहं बहुस्याम प्रजायेय)फुटला,त्या निर्गुण, निराकार परब्रह्मास निर्विशेष (27व्या ओवीमधील मूळ शून्य)असल्याकारणाने त्यास बरड माळरान म्हंटले . त्या अंकुरास अनंत ब्रह्मरुपी फळे लगडतात.

23. त्या ब्रह्मांडामध्ये ही पुढील स्थुल सृष्टी उत्पन्न करण्याची बीजे भरलेली असतात. (जसे उंबराचे प्रत्येक फळ बियांनी भरलेलेच असते)त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या जीवसृष्टीचा हिशेबही लागत नाही.

24. नंतर त्या ब्रह्मगोळकातून अपरिमित बहुविध सृष्टी मूळ आदी संकल्पाच्या प्रभावामुळे उत्पन्न होते.

97. योगी प्रयाणकाळी देह कसा ठेवतो याचे हे वर्णन आहे. त्याचा प्राणवायु हृदयाकाशात संचरून शरीरातील जड व चेतन अशा सर्व भागाचा लय करून भ्रूमध्यात स्थिर होतो. जसा घंटेचा नाद 'सुइंइं'करीत करीत घंटेमध्येच लय पावतो त्याप्रमाणे त्याचा प्राणवायू अमृतत्वात लीन होतो.

115. प्रथम प्राणाचा ॐकारात लय करावा. तो ॐकार त्याच्या अ,ऊ,म या तीन मात्रामूर्ध्न्याकाशात हळुहळु लय करीत त्या तिन्ही मात्राही अर्धमात्रेत म्हणजे ॐकाराचे वरील अर्धचंद्राकार बिंबात-साडे तीन मात्रेत लय करावा. हे धारणेच्या बलाने करावे.

116. नंतर मात्रात्रयाचे अर्धबिबात ऐक्य झाले असता ओंकार शोभतो तसा तो प्राण मूर्ध्न्याकाशात लय पावून शोभतो.

265. अशा प्रकारचे जे स्वर्गसुख इंद्रियांच्या वरकरणी संतोषामुळे इंद्रियांतील ब्रह्मसुखाच्या जागी बसण्यास योग्य गणले जाते , ते स्वर्गसुख एखाद्या शंभर यज्ञ करणाऱ्यासहि लाभत नाही.